# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : १२
## सभावृत्तांत

दिनांक : १८/१२/२००९ वेळ : दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दि.१८/१२/२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.ढोरे उषा उर्फ माई मनोहर
३. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
४. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
५. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.चाकणकर - उपनगरसचिव, मा.पवार - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.प्रकाश बाबर अनुमोदक : मा.अख्तरहुसेन चौधरी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सदस्य मा.भाउसाहेब भोईर यांच्या पत्नी सौ.मनिषा भोईर यांचे तसेच मा.मच्छिंद्र तापकीर यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई तापकीर यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून दि.१/१/२०१० रोजी दु.१/४५ पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.सभापती :- शुक्रवार दि.१/१/२०१० रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : १२
सभावृत्तांत
( दिनांक १८/१२/२००९ ची तहकुब)

दिनांक : १/१/२०१० वेळ : दुपारी १:४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक १८/१२/२००९ ची तहकुब सभा शुक्रवार दि.१/१/२०१० रोजी दुपारी १.४५ वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
४. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
५. मा.बाबर प्रकाश धरमसी
६. मा.खोमणे लता हनुमंत

याशिवाय मा.देशमुख - सहा.आयुक्त,मा.काळे - नगरसचिव, मा.डॉ.कुणचगी - आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.जाधव - शिक्षणाधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

दिनांक ४/१२/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ११) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक :- २३२ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १/१/२०१० विभाग : प्रशासन
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/१३०९/०९ दि.११.११.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.पाटील शशिकांत रामदास यांना प्राचार्य पदावर पे बँड १५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ६६०० मध्ये नेमणुक देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २३३ विषय क्रमांक :- २
दिनांक :- १/१/२०१० विभाग : प्रशासन
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१अ/कावि/७६३/०९ दि.८.१२.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

स्थापत्य विभागाकडील "असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर"पदाची आवश्यकता विचारात घेता ,महापालिका आस्थापनेवरील सदर पदाची - "वेतनश्रेणी : र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ५४०० भरतीप्रमाण : १००% सरळसेवेने शैक्षणिक अर्हता : १) स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी B.E. [civil] २) महापालिकेतील अभियांत्रिकी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव ३) ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरींग मधील पदवीव्युत्तर पदवी असणे आवश्यक ४) ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरिंग मधील कामाचा अनुभव असणे आवश्यक", याप्रमाणे वेतनश्रेणी व शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २३४ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- १/१/२०१० विभाग : प्रशासन
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/६/कावि/६६५/०९ दि.८.१२.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.संजय श्रीरंग विभुते - मजुर यांना वर्तनात सुधारणा करण्याची संधी देउनही त्यांच्या वर्तनात न झालेली सुधारणा, खातेनिहाय चौकशीमध्ये त्यांचेवर सिध्द झालेले दोषारोप, अंतिम नोटीसचा त्यांनी सादर न केलेला खुलासा, चौकशीनंतरही त्यांची १३७ दिवस गैरहजेरी या सर्व बाबी नुसार सन १९९२ ते ऑक्टोबर २००९ या कालावधीतील त्यांची एकुण गैरहजेरी तीन वर्ष १० महिने एवढी असल्याने त्यांची एकुण २० वर्षाची सेवा विचारात घेता त्यांना सक्तीने सेवानिवृत्त करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २३५ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- १/१/२०१० विभाग : जकात
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जकात/१०/कावि/३७७/०९ दि.८.१२.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये नमुद केल्यानुसार महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा धोरण २००९ प्रमाणे जकात नियम २००१ चे अनुसूची २ मध्ये तरतुद करणेस व यास नागरिकांच्या हरकत / सूचना मागविणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/९/कावि/१४/०९

दिनांक - २/१/२०१० चे लगत सही/-

नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.